FORMAT EX – 27

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र. परीक्षा/हिवाळी
/२०१६/३८०
दिनांक: ३० एप्रिल,
२०१६

प्रति

१. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
२. सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
३. प्राचार्य, बॅरि. एस.के. वानखेडे शिक्षण महाविद्यालय/डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय (शहर व मुख्य शाखा), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
४. संचालक, लक्ष्मीनारायण तांत्रिक संस्था, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
५. संचालक, व्यवसाय प्रबंधन विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**विषय: हिवाळी २०१६ परीक्षेकरिता आवेदनपत्रे स्विकारण्याकरीता विहित केलेली पध्दत.**

**संदर्भ: अधिसूचना क्रमांक रातुमनावि/परीक्षा/हिवाळी/२०१६/३७९ /३० एप्रिल २०१६**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अध्यादेश क्र. १९/२००८ चे अनुषंगाने हिवाळी २०१६ परीक्षेसाठी बसणाऱ्या सर्व वर्गवारीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे आपल्या महाविद्यालयात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात, विद्यापीठाने घोषित केलेल्या अंतिम तारखेनुसार स्विकारावयाचे आहेत. आवेदनपत्रे स्विकारण्याचे काम ज्या कर्मचाऱ्यांकडे सोपविले आहे त्यांना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याविषयी कृपया सूचित करावे. परीपूर्ण असलेल्या आवेदनपत्राची दिलेल्या सूचनेनुसार तपासणी करण्यास बाध्य करावे. या कामासाठी बहि:शाल व माजी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्काव्यतिरिक्त नियमाप्रमाणे अतिरिक्त सेवा शुल्क रु. ४०/— आकारण्यात येऊन तृतीय व चतुर्थ श्रेणीतील जे कर्मचारी काम सांभाळतील त्यांना हा मेहनताना देण्यात यावा.

## अति महत्वाच्या सूचना

१. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी सुधारीत नमुन्यातीलच आवेदनपत्र सादर केले आहे, याची खात्री केल्याशिवाय आवेदनपत्र स्विकारु नये. **तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील नियमित प्रवेशित वार्षीक परीक्षेशी संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी तसेच सेमिस्टर पध्दतीच्या सर्व विद्यार्थ्यांनी अधिसूचना क्र. RTMNU/A.N./Pariksha/D-12/1366, दिनांक २९.८.२०१२ आणि क्र.**

RTMNU/COE/१३६७, **दिनांक २९.८.२०१२ मध्ये नमुद व्दसपदम पध्दतीने परीक्षा आवेदनपत्रे जमा करावे.**

२. विद्यार्थी ज्या परीक्षेसाठी आवेदनपत्र सादर करीत आहे, त्या परिक्षेसंबधी अध्यादेश, निर्देश इत्यादींचा व्यवस्थितपणे अभ्यास करून सदर विद्यार्थी त्या परीक्षेसाठी पात्र आहे किंवा नाही याची खात्री केल्याशिवाय आवेदनपत्रे स्विकारु नयेत. अपात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र स्विकारल्यास, त्यानंतरच्या परिणामाची जबाबदारी सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

३. बाहेरच्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून परीक्षा द्यावयाची असल्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मूळ पात्रता प्रमाणपत्र (Original Eligibility Certificate), महाविद्यालय सोडण्याचा दाखला (College Leaving Certificate), मूळ प्रवजन प्रमाणपत्र (Original Migration Certificate), आणि गुणपत्रिकांच्या साक्षांकित प्रती, प्रमाणित छायाचित्र, परीक्षा शुल्कासह अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या तारखेच्या आंतच स्विकारावे.

४. ऐच्छिक विषय आणि पेपरची नांवे, परीक्षा केन्द्र, परीक्षा माध्यम यांचा परीक्षा आवेदनपत्रात स्पष्ट उल्लेख करावा.

५. अन्त्य (Final) परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी भाग—१ व भाग—२ च्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती आवेदनपत्रासोबत जोडलेल्या आहेत याची खात्री करुन घ्यावी. तसेच पदवी/पदविका/प्रमाणपत्र शुल्क रु. २००/— परीक्षा शुल्कासोबत स्विकारावे.

६. एल.एल.बी. (३ वर्षीय व ५ वर्षीय अभ्यासक्रम), एम.बी.ए., अभियांत्रिकी व तांत्रिकी, बी.पी.एड. (१ वर्षीय), व बी.पी.ई. (३ वर्षीय) अन्त्य परीक्षेच्या विद्यार्थ्यांकडून पदवी शुल्क
रु. २००/— व तातुरते पदवी प्रमाणपत्र (प्रोव्हीजनल डिग्री सर्टिफिकेट) शुल्क रु. २००/— परीक्षा शुल्कासोबत स्विकारावे.

७. बहि:शाल(External)विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रात दिलेले चारित्र्याचे व रहिवाशी /वास्तव्याचे प्रमाणपत्र (Character & Residence Certificate) आवेदनपत्रात नमूद केलेल्या व्यक्तिद्वारेच प्रमाणित करुन घ्यावे.

८. महाविद्यालयाने/विद्यापीठ शैक्षणिक विभागाने शुल्क स्विकारल्याची विद्यार्थ्यांना पावती द्यावी व परीक्षा आवेदनपत्रावर तसे नमूद करावे. प्रत्येक आवेदनपत्रासोबत विद्यार्थ्यांनी भरलेल्या परीक्षा शुल्काची एक पावती जोडणे आवश्यक आहे.

९. अंध व अपंग विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेण्याची गरज नाही. फक्त रु. ४०/— सेवाशुल्क व विलंब झाल्यास विलंब शुल्क आकारावे. परंतु अपंग किंवा अंध असलेल्या विद्यार्थ्यांनी सिव्हील सर्जनच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडली असावी, याची खात्री करुनच परीक्षा अर्ज स्विकारावा व अर्जावर तसे नमूद करावे.

१०. सर्व विद्यार्थ्यांची प्रथम वर्षातील नियमित विद्यार्थी वगळून प्रवेशपत्रे व गुणपत्रिका ज्या महाविद्यालयात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात परीक्षा आवेदनपत्र सादर केले असेल त्याच ठिकाणी पाठविल्या जातील. त्याचे विद्यार्थ्यांना वाटप करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

११. एम.कॉम., एम.ए., एम.एस.सी. व व्यावसायिक परीक्षेच्या सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम/विषय सूचीनुसार विषय आणि पेपरची नांवे लिहिणे आवश्यक आहे. विषय

व त्यासाठी बसणाऱ्या पेपर्सची नांवे (Titles) पेपर क्रमांक इत्यादी बिनचूक आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी. नांवे दिली नसल्यास आवेदनपत्र रद्द करण्यात येईल.

१२. जुन्या नमुन्यातील परीक्षा आवेदनपत्रे स्विकारल्यास किंवा अधिसूचनेमध्ये नमूद केलेली अंतिम तारीख संपल्यानंतर आवेदनपत्रे स्विकारल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयाची/विद्यापीठ शैक्षणिक विभागाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. **तसेच अंतिम तारखेनंतर कोणत्याही कारणास्तव परीक्षा आवेदनपत्र स्विकारु नयेत, त्याचप्रमाणे अंतिम तिथी संपल्यानंतर कोणत्याही विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या परीक्षा विभागात परीक्षा आवेदनपत्रे स्विकृत करण्याबाबत मा. परीक्षा नियंत्रक यांची सही व शिक्का घेण्याबाबत कृपया पाठवू नये,** याची देखील कृपया नोंद घ्यावी.

**१३. परीक्षा शुल्कामध्ये हिवाळी २०११ पासून अधिसूचना क्र.** त्ज्डछन्ध्म/व्ब्त्थ्१६२२०ए कंजमक १३.०५.२०११ **अन्वये वाढ करण्यात आलेली असून त्याप्रमाणेच परीक्षाशुल्क स्विकारण्यात यावे याची कृपया नोंद घ्यावी.**

१४. नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र सादर करतांना संबंधित महाविद्यालयाने ख.ालील दस्तावेजाच्या (Xerox) प्रती सादर कराव्यात.

अ) वित्त व लेखा अधिकाऱ्याकडून प्राप्त करण्यात आलेले ना देय प्रमाणपत्र (No Dues Certificate)

ब) महाविद्यालयीन शाखेकडून प्राप्त झालेले नियमित प्राचार्य/कार्यकारी प्राचार्यांचे मान्यतेचे पत्र किंवा महाविद्यालयीन शाखेकडून प्राप्त झालेले संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार असलेले पत्र.

क) महाविद्यालयात शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमाचे माध्यम व प्रवेश क्षमता या संबंधीचे महाविद्यालयीन शाखेचे मंजूरी पत्र.

१५. आवेदनपत्र प्रस्तुत करण्याची मुदत संपल्यानंतर महाविद्यालयाने विद्यापीठ संचालित महाविद्यालये विद्यापीठ शैक्षणिक विभागाने त्या तारखेपासून पुढील पाच दिवसांचे आंत सर्व आवेदनपत्राची पडताळणी व छाननी केल्यानंतर आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करुन परीक्षानुसार सोबत जोडलेल्या विहीत नमुना प्रपत्र—१ (२ प्रतीत) व प्रपत्र—२ (३ प्रतीत) मध्ये माहिती टंकलिखित करुन परीक्षा शुल्काचा **"वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे नांवे काढलेल्या डिमांड ड्राफ्टसह सहायक कुलसचिव (सा. परीक्षा) व सहायक कुलसचिव (व्यावसायिक परीक्षा) यांचे कार्यालयात सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत प्रस्तुत करावा.**

१६. परदेशी बहि:शाल विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र स्विकारतांना तसेच परदेशी विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांनी रजीस्ट्रेशन फी रु. २५,०००/— विद्यापीठात भरल्याची पावती जमा केल्याशिवाय अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र स्विकारु नयेत, तसेच त्यांना प्रवेश देवू नये.

१७. पर्यावरण अभ्यासक्रम हा विषय निर्देश क्र. २/२०१० नुसार द्वितीय वर्षातील पदवी परीक्षांकरिता अनिवार्य करण्यात आला आहे अश्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात या विषयाकरिता ॑बेंस प्रवेश घेऊन हा विषय पूर्ण करावा व त्याच महाविद्यालयातून आवेदनपत्र सादर करावे.

१८. बी.ए. व बी.ए. (अतिरिक्त) बहि:शाल अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेचे विषय घ्यावयाचे असल्यास अश्या विद्यार्थ्यांनी ज्या संबंधित महाविद्यालयात ते विषय शिकविण्यात येतात तेथेच ॑बेंस प्रवेश घेऊन त्याच महाविद्यालयातील बहि:शाल विद्यार्थी म्हणून त्याच महाविद्यालयातून ऑनलाईन पध्दतीने परीक्षा आवेदनपत्र सादर करावे.

१९. सर्व बहि:शाल विद्यार्थ्यांची यादी विद्यार्थ्यांच्या पूर्ण माहितीसह आपल्या स्तरावर ठेवण्यात यावी व परीक्षेसंबंधी सर्व माहिती सर्व विद्यार्थ्यांना मिळेल याची दक्षता घ्यावी.

शासन निर्णय क्र. संकिर्ण ९९०३/(८१७३/०३) वि.शि. २, दिनांक ११ मार्च, २००५ च्या नुसार वडीलांच्या नावानंतर आईच्या नावाची नोंद घेण्याबाबत परीक्षा मंडळाच्या दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार हिवाळी २०१६ परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे वडीलांचे नावानंतर आईच्या नावाची नोंद घेणे आवश्यक आहे. क्रमाक्रमाने दर वर्षी ही प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात यावी.

प्रपत्र—१ मधील विद्यार्थ्यांच्या नावाप्रमाणे परीक्षा आवेदनपत्रे क्रमश: व्यवस्थित लावूनच सादर करावीत. वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेची प्रत, अतिमहत्वाच्या सूचना व विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र भरतांना व सादर करतांना घ्यावयाची खबरदारी बाबतच्या सूचनांची प्रत या पत्रासोबत पाठवित आहे. हया दोन्हीही प्रती आपल्या महाविद्यालयाच्या सूचना फलकांवर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी लावाव्यात, ही विनंती. त्याचप्रमाणे सदर सूचनांची प्रत विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

वरील सूचनांमध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल व सुधारणा करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे, कृपया याची नोंद घ्यावी.

आपला स्नेहांकित,

सहपत्रे:

(निरज खटी)
परीक्षा नियंत्रक,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ.

प्रतिलिपी माहिती व योग्य कार्यवाहीसाठी अग्रेषित:

१. सर्व अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
२. वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३. सहाय्यक कुलसचिव, विद्यापीठ उपकेंन्द्र, गडचिरोली, यांना कळविण्यात येते की, त्यांनी स्विकारलेली सर्व परीक्षा आवेदनपत्रे पुढील **तीन दिवसांचे आंत** विद्यापीठाचे परीक्षा विभागात जमा करावीत. त्यानंतर कोणत्याही प्रकारची परीक्षा आवेदनपत्रे स्विकारल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

FORMAT EX – 28

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
## विद्यार्थ्यांसाठी सूचना

**हिवाळी २०१६ परीक्षेकरिता ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्र भरतांना व सादर करतांना विद्यार्थ्यानी घ्यावयाची काळजी व खबरदारी**

विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयात/विद्यापीठ शैक्षणिक विभागात सादर करतांना खालील दिलेल्या सूचनांचे तंतोतंत व काटेकोरपणे पालन करावे.

१. हिवाळी २०१६ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा आवेदनपत्रे सादर करावीत. **तसेच प्रथम व द्वितीय वर्षातील नियमित प्रवेशित वार्षीक परीक्षेशी संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी तसेच सेमिस्टर पध्दतीच्या सर्व विद्यार्थ्यांनी अधिसूचना क्र. RTMNU/A.N./Pariksha/D-12/1366, दिनांक २९.८.२०१२ आणि क्र. RTMNU/COE/1367, दिनांक २९.८.२०१२ मध्ये नमुद व्दसपदम पध्दतीने परीक्षा आवेदनपत्रे जमा करावे.**

२. विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरुन विद्यापीठाने अधिसूचनेद्वारे **जाहीर केलेल्या तारखांच्या आंतच सादर करावे व वरील क्र. १ नुसार परीक्षा आवेदन भरावे.**

३. अपूर्ण व निर्धारित परीक्षाशुल्क भरलेले व कोणत्याही प्रकारचे अपूर्ण परीक्षा आवेदनपत्र कोणतेही कारण न देता तसेच पत्रव्यवहार न करता नाकारण्यात येईल.

४. महिला महाविद्यालयामधून पुरुष विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे सादर करु नयेत.

५. छायाचित्र संबंधित व्यक्तीद्वारे प्रमाणित केले असावे. गुणपत्रिकेच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती व पूर्ण परीक्षा शुल्कासहित आवेदनपत्र संबंधित महाविद्यालयात सादर करावे.

६. अन्त्य (Yearly Pattern) परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी भाग—१ व भाग—२ च्या गुणपत्रिकेच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती परीक्षा आवेदनपत्रासोबत जोडाव्यात तसेच पदवी / पदविका / प्रमाणपत्र शुल्क रु. २००/— परीक्षा शुल्कासोबत भरावे.

७. एल.एल.बी. (३ वर्षीय व ५ वर्षीय अभ्यासक्रम), एम.बी.ए., अभियांत्रिकी व तांत्रिकी, बी.पी.एड. (१ वर्षीय) व बी.पी.ई. (३ वर्षीय) अन्त्य परीक्षेच्या विद्यार्थ्यांनी पदवी शुल्क रु. २००/— व तात्पुरते पदवी प्रमाणपत्र (प्रोव्हीजनल डिग्री सर्टिफिकेट) शुल्क रु. २००/— परीक्षा शुल्कासोबत भरावे.

८. बहि:शाल (External) विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रात दिलेले चारित्र्याचे व रहिवाशी प्रमाणपत्र (Character – Residence Certificate) आवेदनपत्रात नमूद केलेल्या व्यक्तिद्वारेच प्रमाणित करुन घ्यावे.

९. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त बाहेरील विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांस पुढील शिक्षण या विद्यापीठातून घ्यावयाचे असल्यास संबंधित विद्यापीठाचे मूळ प्रवजन प्रमाणपत्र (Original Migration Certificate), महाविद्यालय सोडल्याचा दाखला (College Leaving Certificate) व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे मूळ पात्रता प्रमाणपत्र (Original Eligibility Certificate) परीक्षा आवेदनपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थ्यांनी बँक ड्राफ्टसह स्वतंत्ररित्या पाठविलेले आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

११. ज्या महाविद्यालयात संबंधित अभ्यासक्रमाचा अंतर्भाव आहे त्याच महाविद्यालयातून बहि:शाल (External) विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र सादर करावेत.

१२. नियमित महाविद्यालयीन माजी विद्यार्थ्यांनी पूर्वी ज्या महाविद्यालयाचे नियमित विद्यार्थी होते, त्याच महाविद्यालयामधून परीक्षा आवेदनपत्रे सादर करावी.

१३. प्रत्येक बहि:शाल व माजी विद्यार्थ्यास परीक्षा शुल्काशिवाय अतिरिक्त सेवा शुल्क द्यावे लागेल.

१४. शुल्क भरल्याची पावती घेणे आवश्यक आहे व ती निकाल जाहीर होईपर्यंत जपून ठेवणे ही विद्यार्थ्याची जबाबदारी राहील.

१५. सर्व विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे व गुणपत्रिका ज्या महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर केलेले असेल त्याच महाविद्यालयात पाठविल्या जातील. विद्यार्थ्यांनी त्या महाविद्यालयातून प्रवेशपत्र व गुणपत्रिका प्राप्त करुन घ्याव्यात.

१६. एम.ए., एम.कॉम., एम.एस.सी. व व्यावसायिक परीक्षेच्या सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सुचीनुसार विषय आणि पेपरची नांवे (महाविद्यालयात जे विषय शिकविले जात असेल असेच विषय) लिहीणे आवश्यक आहे. विषय व त्यासाठी बसणाऱ्या पेपर्सची नावे (शिर्षक), पेपर क्रमांक इत्यादी बिनचूक आहे याची खात्री करुन घ्यावी. नांवे दिली नसल्यास आवेदनपत्र रद्द करण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

१७. अंध व अपंग विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी त्यांचेपेक्षा कमी शिकलेला व्यक्ती लेखनिक (Writer) म्हणून घेता येईल. परंतू या सवलतीचा फायदा घेतेवेळेस संबधित विद्यार्थ्याला सिव्हील सर्जन/आर्थोपेडीक सर्जन (अस्थिव्यंगोपचार शल्यचिकित्सक) यांनी दिलेले मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र मुख्य पर्यवेक्षकाकडे पडताळणीसाठी प्रस्तुत करावे लागेल. तसेच पेपरच्या वेळेव्यतिरिक्त अंध विद्यार्थ्यांच्या लेखनिकाला एक तास व अपंग विद्यार्थ्यांच्या लेखनिकास अर्धा तास जास्तीच्या वेळेची सवलत घेता येईल. या सवलतीचा फायदा घेण्यासाठी अशा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मुख्यपर्यवेक्षक यांचेशी परीक्षा सुरु होण्यापूर्वी संपर्क साधून परवानगी प्राप्त करुन घ्यावी.

१८. हॅन्ड कोऑर्डीनेशन समस्या असलेल्या तसेच दृष्टीदोष असलेल्या अपंग (Visually Handicapped) विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी पेपरच्या वेळेच्या व्यतिरिक्त अर्धा तास जास्त वेळेची सवलत प्राप्त होवू शकते. या सवलतीचा फायदा घेण्यासाठी सिव्हील सर्जन/आर्थोपेडीक सर्जन यांचे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र मुख्यपर्यवेक्षकांना पडताळणीसाठी प्रत्यक्ष प्रस्तुत करुन परीक्षा सुरु होण्याचे अगोदर त्यांची परवानगी प्राप्त करुन घ्यावी.

१९. शासन निर्णय क्र. संकिर्ण ९९०३/(८१७३/०३) वि.शि. २, दिनांक ११ मार्च, २००५ च्या नुसार वडीलांच्या नावानंतर आईच्या नावाची नोंद घेण्याबाबत परीक्षा मंडळाच्या दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार उन्हाळी २०१३ परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणा—या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी/विद्यार्थीनीनी वडीलांचे नावानंतर आईच्या नावाची नोंद घेणे आवश्यक आहे.

२०. पर्यावरण अभ्यासक्रम हा विषय निर्देश क्र. २/२०१० नुसार द्वितीय वर्षातील पदवी परीक्षांकरिता अनिवार्य करण्यात आला आहे अशा द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयात या विषयाकरिता बॅंस प्रवेश घेऊन हा विषय पूर्ण करावा व त्याच महाविद्यालयातून आवेदनपत्र सादर करावे.

२१. बी.ए. व बी.ए. (अतिरिक्त) बहि:शाल अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षेचे विषय घ्यावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी ज्या संबंधित महाविद्यालयात ते विषय शिकविण्यात येतात तेथेच बॅंस प्रवेश घेऊन त्याच महाविद्यालयातील बहि:शाल विद्यार्थी म्हणून त्याच महाविद्यालयातून परीक्षा आवेदनपत्र सादर करावे.

२२. सर्व बहि:शाल विद्यार्थ्यांची यादी विद्यार्थ्यांच्या पूर्ण माहितीसह आपल्या स्तरावर ठेवण्यात यावी व परीक्षेसंबंधी सर्व माहिती सर्व विद्यार्थ्यांना मिळेल याची दक्षता घ्यावी.

त्यानुसार हिवाळी २०१६ परीक्षेसाठी आवेदनपत्र भरणाऱ्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींनी वडीलांचे नावानंतर आईच्या नावाची नोंद घेणे आवश्यक आहे.

(निरज खटी)
परीक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ.